18-02-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 17-02-2025 22:46 Page 1

विद्यार्थ्यांनी गिरवले करियर कौशल्याचे धडे..!

आंबिये महाविद्यालयातील इंग्रजी विभागातर्फे कार्यशाळा प्रशिक्षक सचिन पाध्ये यांचे मार्गदर्शन

■ टीम दैनिक हेराल्ड

विर्नोडा, दि. १७ : संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय, विर्नोडा येथील इंग्रजी विभागातर्फे करियर कौशल्ये : संवाद, शिष्टाचार आणि यशाची रणनीती या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. टीईएफएल प्रमाणित प्रशिक्षक सचिन पाध्ये यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक पातळीवरील संवाद कौशल्ये वाढविणे आणि कामाच्या ठिकाणी शिष्टाचार कसे पाळावेत याचे तंत्र विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे हे या कार्यशाळेचे हेतू होते. या कार्यशाळेचे आयोजन उपप्राचार्या डॉ. ल्युसी जेम्स यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. सिद्धी सांगळे यांनी केले. मयूरी पेडणेकर यांनी सूत्रसंचालन केले. तर आभार महिमा यांनी आभार मानले. या कार्यशाळेत महाविद्यालयातील ४८ विद्यार्थ्यांना सहभाग दर्शविला.

प्रशिक्षक सचिन पाध्ये यांनी विद्यार्थ्यांना प्रभावी भाषण तंत्रे, देहबोली आणि योग्य मुलाखत कशी द्यावी, त्यासाठी कोणत्या रणनीतीचा वापर करावा याविषयी मार्गदर्शन केले. कंपन्यांमधील व्यावसायिक संवाद, कामाच्या ठिकाणी पाळावयाचे शिष्टाचार, सहकाऱ्यांविषयी आदरभावना या घटकांविषयीही विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्ये विकसित होऊन त्याचा वापर त्यांना भविष्यात करियरच्या अनुषंगाने करता यावा, त्यांच्यामधील आत्मविश्वास वाढीस लागून त्यांना यशप्राप्ती व्हावी, या उदात्त हेतूने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते, डॉ. ल्युसी जेम्स यांनी सांगितले.

विर्नोडा : प्रशिक्षक सचिन पाध्ये यांच्यासोबत कार्यशाळेत सहभागी झालेले विद्यार्थी, महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. ल्युसी जेम्स, प्रा. सिद्धी सांगळे व इतर मान्यवर.

पान १ वरून

'महाराष्ट्रात लव्ह जिहाद' विरोधी कायद्यासाठी विशेष समिती गठीत

संविधान तज्ज्ञांनी या मुद्द्यावर भाष्य करताना म्हटले आहे की, राज्यघटनेनुसार कोणत्याही व्यक्तीला धर्म स्वातंत्र्याचा अधिकार आहे. तसेच, जबरदस्तीने धर्मांतर केल्यास आधीच कायद्याने शिक्षेची
तरतूद आहे. त्यामुळे नवीन कायदा केवळ राजकीय हेतूने आणला जात असल्याचे दिसते. दरम्यान, प्रेम विवाह करणाऱ्या जोडप्यांसाठी सातारा
जिल्ह्यात एक सेफ हाऊस' कार्यरत आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि स्नेह आधार फाउंडेशनच्या पुढाकाराने चालवल्या जाणाऱ्या या केंद्रात अशा जोडप्यांना मानसिक आधार, निवास आणि सुरक्षा पुरवली जाते.

'तारिले अभंग इंद्रायणीने' नाटकास हरमलात प्रतिसाद

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. १७ : खालचावाडा येथील श्री नारायण देवस्थानच्या ३० व्या वर्धापनदिन सोहळ्यात सादर केलेल्या स्व. मुरारी जिवाजी लिखित संतकालीन तारिले अभंग इंद्रायणीने नाटकास रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. सदर नाटक क्षत्रिय मराठा समाज हौशी तरुण नाट्य मंडळाने सादर केले.ह्या नाटकाचे दिग्दर्शन प्रशांत पेडणेकर,सूत्रधार हेमंत बांदेकर,सहाय्यक सुधीर रेडकर, गोविंद फटनाईक,नेपथ्य मंथन बांदेकर,पार्श्वसंगीत राम खवणेकर,संगीत दिग्दर्शक सुजय तिळवे ,तबला राजीव गावकर,पर्श्वसूचक मुन्ना,मंथन,मंजिरी गजानन तारी,रंगमंच किरण कला केंद्र, मये,ध्वनी शिरोडकर बांदा यांची होती.ह्या नाटकात निखिल पेडणेकर(तुकाराम),प्रशांत पेडणेकर (रामजी सावकार), शौर्या तारी (काशी),स्मिता गोकर्णकर (आवली),रोहित गोकर्णकर (सालो मालो),अंश गोकर्णकर (महादेव),कृष्णा पेडणेकर (संताजी),सोहम रेडकर (मंबाजी) ,मयुरी दाभोलकर(देवी इंद्रायणी),गोविंद पेडणेकर (धनाजी),महेश गोकर्णकर (रामेश्वर भट्ट) व दत्तराज खोर्जे (श्री विठ्ठल) तर साथी कलाकार पांडुरंग रेडकर,दिगंबर गोखले,दीप गोकर्णकर,सोहम ओटवणेकर,अजय माज्री, दिपराज घाटवळ,दुर्वांक दाभोलकर,वृषभ फटनाईक,सदानंद दाभोलकर,स्वस्तिक दाभोलकर,राज खवणेकर,रौनक नागवेकर, रघुराज गोकर्णकर यांनी सहकार्य केले.ह्या नाटकातील प्रत्येक व्यक्तिरेखेस रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.गायन तसेच अभिनय क्षेत्रात कलाकारांनी खास मेहनत घेतल्याचे दिसून आले. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष राजेश गोकर्णकर यांनी दिग्दर्शक प्रशांत पेडणेकर व कलाकारांचे अभिनंदन केले.

इब्रामपुर येथे उद्या वेशभूषा स्पर्धा

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. १७ : इब्रामपुर पेडणे येथे बुधवार दि. १९ फेब्रुवारी रोजी गोमंतक मराठी अकादमी पर्वरी व माऊली क्रिएशन इब्रामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने सरकारी प्राथमिक विद्यालय व मातृछाया पूर्व प्राथमिक विद्यालय इब्रामपूर यांच्या विद्यार्थ्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराज आणि शिवकालीन इतिहास या विषयावर वेशभूषा स्पर्धा तसेच नृत्य सादरीकरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श मुलांपुढे ठेवून त्यांच्या जीवनाला एक चांगली दिशा देण्याचा हा छोटासा प्रयत्न असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व प्रमुख वक्ते म्हणून आत्माराम गावकर, खास निमंत्रित म्हणून गोमंतक मराठी अकादमी चे अध्यक्ष श्री प्रदीप घाडी आमोणकर,गोविंद शिरोडकर, गावचे सरपंच श्री. अशोक धाऊसकर, जामन माद्रेंकर , डॉ. उदय कुडाळकर, मुख्याध्यापिका वंदना कलंगुटकर, भारत बागकर, राजन खडपकर, कमलाकांत शिरोडकर, माऊली क्रिएशन अध्यक्ष दिपक शिरोडकर उपस्थित राहणार आहेत. इब्रामपूर ग्रामपंचायत यांच्या सहाय्याने हा कार्यक्रम आयोजित केला असून सर्व ग्रामस्थ, विद्यार्थी व शिवप्रेमींनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी करण्यात आले आहे.

केपे महाविद्यालयात 'कथासाहित्या'वर व्याख्यान

■ टीम दैनिक हेराल्ड

केपे, दि. १७ : गोवा विद्यापीठ, संत सोहिरोबानाथ आंबिये अध्यासन, अतिथी प्राध्यापक संशोधन संचालनालय, मराठी अध्ययनशाखा, शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा आणि मराठी विभाग, शासकीय कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय केपे यांच्या संयुक्त विद्यमाने आशा बगे यांचे 'कथासाहित्य' या विषयावर डॉ. अरुणा ढेरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

यावेळी प्रमुख वक्त्या, लेखिका तथा संशोधक डॉ. अरुणा ढेरे, व्याख्यानमालेचे संयोजक डॉ. विनय मडगावकर, महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. सरिता उसगांवकर आणि मराठी विभाग प्रभारी दिप्ती फळदेसाई आदी मान्यवर उपस्थित होते.

मराठी विभाग प्रभारी दिप्ती फळदेसाई यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डॉ. विनय मडगांवकर यांनी आपल्या प्रास्ताविकात व्याख्यानमालेची उद्दिष्टे स्पष्ट केली. तद्नंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. तसेच सहा. प्रा. रेखा कोळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तृतीय वर्ष विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या डॉ. अरुणा ढेरे' या विषयावरील भित्तीपत्रकाचे अनावरण करण्यात आले. सहा. प्रा. गौरी नाडकर्णी प्रभू वेळगेकर यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. डॉ. अरुणा ढेरे यांनी आशा बगे यांची पार्श्वभूमी, त्यांचे लेखन, त्यातील विषय, आशय यासह त्यांच्या कथेचे विविध आयाम श्रोत्यांसमोर उलगडले. तृतीय वर्ष विद्यार्थिनी स्वराली टेंग्से हिने गोमंतकीय संस्कृतिदर्शक अशा नांगरणी' या विठ्ठल गावस यांच्या कथेचे वाचन केले. व्याख्यानाला विविध विभागांतील विद्यार्थी तसेच शिक्षक उपस्थित होते. व्याख्यान संयोजक सहाय्यक प्रा. सोनिया सावंत यांनी कार्यक्रमाचे संयोजन करुन सूत्रसंचालन केले.

दामोदर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची यशस्वी कामगिरी

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १७ : श्री दामोदर उच्च माध्यमिक विद्यालयाची सेंट झेवियर्स महाविद्यालयाच्या ९ व्या वार्षिक विज्ञान महोत्सव प्रदर्शनात उत्तुंग भरारी मारली.

श्री दामोदर उच्च माध्यमिक विद्यालय विज्ञान शाखा कोंब–मडगावच्या विद्यार्थ्यांना तनिष्का कोलवेकर आणि सक्षम फळदेसाई यांना त्यांच्या मेनोम – ऑटोमेटेड एक्वा या विज्ञान प्रदर्शनीत प्रथम पारितोषिक देण्यात आले. राज्यस्तरीय सेट झेवियर महाविद्यालय आणि रसायनशास्त्र विभाग म्हापसा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विज्ञान प्रदर्शनात विजेतेपद घेऊन बाजी मारली. त्यांच्या या यशाबद्दल व्यवस्थापन मंडळ, प्राचार्य राजीव देसाई, शिक्षक व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

कमळेश्वर विद्यालयात बाजार डे

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. १२ : कोरगाव पेठेचावाडा येथील श्री कमळेश्वर पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयात बाजार दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना आर्थिक, व्यवहारी समज यावी, लहान वयात त्यांना पैशांचे महत्त्व कळावे व सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोणतेही चांगले काम करताना लाज वाटू नये, या उद्देशाने श्री कमळेश्वर पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयाच्या शिक्षकांनी बाजार दिवस घडवून आणला. विद्यार्थ्यांनी घरगुती वस्तू, भाज्या, फळे, लाडू इत्यादी विक्री केली. ६० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. पालक व इतर नागरिकांनीही सहभाग दाखवला. तसेच वस्तू खरेदी केल्या. या कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. तसेच भारतीय परंपरेनुसार दीपप्रज्वलन करण्यात आले. उद्घाटनावेळी श्री कमळेश्वर शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव निळकंठ थळी, हायस्कूल विभागाचे पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष सुभाष शेट्ये तसेच प्राथमिक विभागाच्या पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्ष प्रशिला गावडे, हायस्कूलचे मुख्याध्यापक आत्माजी नाईक सर व इतर शिक्षक उपस्थित होते.

यावेळी हायस्कूल विभागाच्या विद्यार्थीनीनी संगीत शिक्षकांच्या सहाय्याने एक सांघिक गीत सादर केले. कार्यक्रम आयोजित करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक आत्माजी नाईक यांनी मेहनत घेतली. तसेच पालक शिक्षक यांच्या सहाय्याने कार्यक्रम उत्साहात पार पाडला. शिक्षिका वर्षा गावडे यांनी स्वागत केले.

आरोबा प्राथमिक विद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. १७ : सरकारी प्राथमिक विद्यालय आरोबा – धारगळ शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण समारंभ मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. स्नेहसंमेलनासाठी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे एकनाथ काळू महाले, खास निमंत्रित प्रफुल्लता सोनू पवार, मुख्याध्यापिका प्रांजल कवठणकर, बीआरपी स्मिता केणी, ज्येष्ठ नागरिक सुहास नाईक, पालक शिक्षक संघ अध्यक्ष लक्ष्मण साळगावकर तसेच शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सोनाली नाईक उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे एकनाथ काळू महाले यांनी आपल्या भाषणात सरकारी प्राथमिक शाळांना चांगल्या सुविधा दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे आपली शाळा घडत आहेत म्हणून मराठी शाळेत मुलांना जरूर पाठवावे असे पालकांना सांगितले.

यावेळी २०२४–२५ या शालेय वर्षात विद्यालयात विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या त्या सर्व विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. शेवटी विद्यार्थ्यांनी विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर केले. त्यात सत्यम शिवम नृत्य, मोनोलॉग, कोळी नृत्य, मिनी गोवन व्हनी इत्यादी सादर केले. सूत्रसंचालन शिक्षिका प्रीती शेटकोरगावकर, पौर्णिमा कोरखणकर व मेघनी बुगडे यांनी केले. अहवाल वाचन मुख्याध्यापिका प्रांजल कवठणकर यांनी केला.

...आणि त्यांनी जाणून घेतली शेतीची गुपिते..!

आंबिये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची भारतीय कृषी संशोधन परिषदेला भेट

टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. १७ : संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय, विर्नोडा येथील वाणिज्य विभागातर्फे रोजी जुने गोवा येथील भारतीय कृषी संशोधन संस्थेला (आयसीएआर–इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चर रिसर्च) भेट दिली. बी.ए.भाग एक आणि बी.कॉम भाग एक कृषीप्रेरणेचा परिचय व्हावा तसेच आतिथ्य व्यवस्थापन या विषयातील कौशल्य वर्धित अभ्यासक्रमाचा भाग म्हणून ही शैक्षणिक सहल आयोजित केली होती. भारतीय कृषी संशोधन परिषदेतील तरुण व्यावसायिक ओंकार सावंत यांनी बागकामाविषयी मार्गदर्शन केले. विविध नारळ प्रजाती आणि त्यांच्या उत्पत्तीची माहितीही त्यांनी दिली. यानंतर विद्यार्थ्यांनी पशुसंवर्धन विभागालादेखील भेट दिली. पशुधन व्यवस्थापन आणि शाश्वत प्रजनन पद्धतीबद्दल विद्यार्थ्यांनी जाणून घेतले. याशिवाय शेतीतील खत तयार करणे, गांडूळ खत तयार करणे याची माहिती घेण्याबरोबरच बाजरी, केळी, पपई, आंबा, काजू आणि भाज्यांची लागवड यांविषयी सखोल माहिती विद्यार्थ्यांनी घेतली. या अभ्यास सहलीचे समन्वयन वाणिज्य विभागातील प्रा.श्रीमती नाईक आणि अपूर्वा नाईक यांनी केले.

आधुनिक शेती तंत्रांचा वापर करून विद्यार्थी स्वत:चे कृषी उपक्रम कसे सुरू करू शकतात याचे मार्गदर्शनही भारतीय कृषी संशोधन परिषदेतर्फे विद्यार्थ्यांना करण्यात आले. वाणिज्य विभागाने पुढाकार घेऊन या शैक्षणिक सहलीचे आयोजन केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाश्वत शेती आणि आधुनिक शेती पद्धती विषयी व्यापक समज आली.

CHANGE IN NAME

I **NAGESHWARI POLNATI** R/O H NO 717, CHOVOTH, CORTALIM MORMUGAO GOA like to change my name from **NAGESWARI POLNATI** to **NAGESHWARI POLNATI.** Hereafter in all my dealing and documents I will be known by the name **NAGESHWARI POLNATI.**

CHANGE OF NAME

I, the undersigned Lobo Edwin, resident of House No. 427/1, Almeida Vaddo, Parra, Bardez, North Goa 403510, wants to change my name from Lobo Edwin Peter to **Lobo Edwin**.
Hereinafter I will be known as **Lobo Edwin** in all my dealings and documents.
Sd/- Lobo Edwin

GOVERNMENT OF GOA
OFFICE OF THE ASSTT. REGISTRAR OF COOPERATIVE SOCIETIES, ARBITRATION / EXECUTION, NORTH GOA DISTRICT, At "Sahakar Bhavan", 1st Floor, Curti, Ponda Goa.

ABN Case No.: ARCS/VPK/PORVORIM/2023/ABN/2043
VPK Urban Co-operative Credit Society Ltd. Porvorim Branch, Bardez Goa. .....Disputant
V/s
1. Mr. Hafizur Chhabed Rahaman, H.No.1611/15, Orda Candolim Bardez Goa.
2. Mr. Anilkumar Jagvirsing Chaudhary, H.No.1503/1 68 Mangirish Colony Madel Tivim Goa
3. Mr. Hamidur Chhabed Rahaman, H.No.1611/15 Orda Candolim Bardez Goa.
4. Mr. Hemant Krishnanath Malvankar, H.No.15 Moica Pilerne Bardez Goa. ..... Opponents

(Summons under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908)

To,
The Opponent No. 1 & 3

WHEREAS, the above mentioned disputant society has instituted a dispute against you, Opponents for recovery of dues, in terms of section 83 of the Goa Co-operative Societies Act, 2001.

AND WHEREAS the disputant has claimed a sum of **Rs.4896480.40** (Rupees Forty Eight Lakhs Ninety Six Thousand Four Hundred Eighty and paise Forty Only with accrued interest thereon and cost.

AND WHEREAS, the proceedings has been initiated into the same and the summons/notice issued to you at your last known address returned unserved with postal remarks "**Party Not Known** returned to sender" respectively.

AND WHEREAS, the disputant vide application dated 17.02.2025 prayed to publish the notice on local newspaper as substitute service as required under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908.

AND WHEREAS the court is satisfied that this is fit case for ordering substitute service by publication of notice on local newspaper.

NOW THEREFORE, the above opponents hereby summoned by this notice to appear before me in person on **11.03.2025 at 03.00 p.m.** and to produce on that day all the documents upon which they intend to rely in support of their defense.

TAKE NOTE that in default of your appearance on the date and the time as stipulated above, the matter will be heard and determined in your absence.

Given under my hand & seal of this office on this 17th day of Feb 2025.

Place: Ponda
Date: 17.02.2025
SEAL
Sd/- (**Harischandra S. Gawde**)
Asstt. Registrar of Co-op Societies
ABN/EXE North Goa District Curti
Ponda- Goa.

CHANGE IN NAME

I **Yashwant Choudhary,** R/O Sabmin appt., SF1, Near NEI School, Curchorem, South - Goa. do hereby change my name from **Yashwat Murari Choudhary** To **Yashwant Choudhary.** Hereinafter, in all my dealings and Official documents, passport etc. I will be known by the name **Yashwant Choudhary.**
Sd/- **Yashwant Choudhary**

IN THE COURT OF JOINT MAMLATDAR I OF BARDEZ TALUKA AT MAPUSA GOA
Case No. JM-I / TNC / NEG-DEC / u/s.7 / Parra / 03 / 2023

1. Mr. Anil Ganu Sawal alias Aniesh Ganu Sawal, R/o H. No. 309/2, Boquenchem Aradi, Parra, Bardez, North Goa 403510 ..... Applicant
V/s
1. Mrs. Maria Anninha Braganza E Godinho alias Maynino Godino, r/o Flat No. 501, A Wing, Vaishali Apartment, Khar West, Mumbai 400052 2. Mr. Adilino D'souza, R/o H. No. 437, Almeida Waddo, Parra, Bardez, Goa ....Opponents

PUBLIC NOTICE

To The Opponents
Whereas the applicant above named has made an application dated 21/02/2023 u/s 7 of the Goa Daman & Diu Agricultural Tenancy Act 1964, for negative declaration with regards to property surveyed under Sy. No. 11/9 situated at Parra, Bardez, Goa in this Court against you.

And whereas the applicant vide his application dated 23/12/2024 has submitted the notices returned unserved and has therefore prayed for publication of notice by way of substitute service.

And whereas in my opinion this is fit case for publication under order V Rules 20(1)(A) of C.P.C. 1908 to publish the notice through local newspaper for vide publicity.

Now therefore, in terms of provision of the order V Rule 20(1)(A) for C.P.C. 1908, above opponents or their legal heirs are hereby called upon to appear in this court on **05.03.2025 at 3.00 pm** to answer the claim of the applicant. Take notice that in default of your appearance as aforesaid on the above date and time, the said application will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of this Court on this 27th day of January 2025.

Sd/- **Devanand P. Prabhu**
Joint Mamlatdar I of Bardez, Mapusa, Goa

VILLAGE PANCHAVAT FATORPA - QUITAL, FATORPA – GOA

No.VP/FQ/2024-25/ 644 **QUOTATION NOTICE** Dated:17/02/2025

The Sarpanch of Village Panchayat Fatorpa-Quital invites sealed Quotation from eligible suppliers to Supply the following items to Village Panchayat Fatorpa-Quital.

Sr. No.	Items	Price Per Item / Qty
1	Computer with printer	1

The quotation shall reach to this Office on or before **27/02/2025 by 5:00 pm** & the same will be opened on **28/02/2025 by 10:30 am** in the office of the Village Panchayat Fatorpa Quital Quepem- Goa.

The specific details related to above items is available in the office of V.P Fatorpa-Quital during office hours.

Panchayat reserves the right to accept or reject all the quotations without giving any reasons thereof.

Seal
Sd/-
(Shital S. Naik) Sarpanch, V. P. Fatorpa-Quital.